**– विशेष खटला क्र. ५२/२०२४ मधील नि.क्र.१७ वरील आदेश –**

(घोषित दि. २४/०४/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार/आरोपी अनिल हिरामन राठोड , कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७ चे कामी जप्त केलेली रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) ही जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्रासह मुद्देमाल कामी जमा असल्याने सदरची रककम नि.क्र.३ चे आदेशाचे अनुषंगाने न्यायालयामार्फत परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, मे. न्यायालय यांनी दि.१०/०४/२०२५ रोजी नि.क्र.३ वर पारित केलेल्या आदेशाची पुर्तता करताना असे समजून आले की, गुन्हयाकामी जप्त करणेत आलेली रककम ही संबंधित पोलीस स्टेशनला जमा नसून ती तपासी अंमलदार यांनी दोषारोपपत्रासह जिल्हा न्यायालयात मुद्देमाल कामी जमा केलेली आहे. त्यामुळे नि.क्र.३ चे आदेशाची पुर्तता करणे अशक्य आहे. तरी गुन्हयाकामी जप्त करुन न्यायालयात जमा करणेत आलेली रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) ही संबंधित मुद्देमालाबाबत योग्य ते आदेश पारित करणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

३. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.३ लगत म्हणणे देवून न्यायपुर्ततेसाठी आवश्यक ते आदेश पारित करणेत यावेत असे

म्हटले आहे. तसेच संबंधित तपासी अंमलदार यांनी नि.क्र.१८ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणणे नुसार स्पेशल केस नंबर ५२/२०२४ मधील मुद्देमाल रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/- (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/-) ही दि.१७/१०/२०२४ रोजी दोषारोपपत्रासोबत न्यायालयात जमा करणेत आलेली आहे असे म्हटले आहे.

४. दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाच्या अवलोकनातून असे दिसते की, कुडाळ पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, चे कामी जप्त करणेत आलेली रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/- (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/-) ही जिल्हा न्यायालयात गुन्हयातील मुद्देमाल म्हणून सामील आहे. त्यामुळे ती रक्कम अर्जदार यांना नि.क्र.३ चे आदेशान्वये परत देणे क्रमप्राप्त आहे. करिता खालील प्रमाणे नव्याने आदेश पारित करणेत येत आहे.

## - आदेश -

१. अर्ज नि.क्र.३ च्या आदेशास अधीन राहून मंजूर करणेत येतो.

२. संबंधित अधीक्षक न्याय यांना असे आदेशित करणेत येते की, कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये दाखल करणेत आलेल्या दोषारोपपत्रासोबत गुन्हयाकामी जप्त करणेत आलेली रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/- (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/-) अर्जदार अनिल हिरामन राठोड रा. ओरोस, जैतापकर कॉलनी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांना रक्कम रुपये ७,००,०००/- (रक्कम रुपये सात लाख मात्र) इतक्या रक्कमेच्या बंधपत्रावरखालील नमूद अटीस

अधीन राहून परत करण्यात यावी.

अ ) अधीक्षक न्याय यांनी अर्जदार याचे ताब्यात रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) देताना अर्जदारांकडून रोख रक्कमेच्या झेरॉक्स प्रती अर्जदारांच्या खर्चाने काढून घेवून अभिलेखावर ठेवून घ्याव्यात. तसेच रक्कम परत करतेवेळी चलनी नोटांचे क्रमांक नमूद करुन घ्यावेत.

DESHMUKH VIDYA SHARADRAO
Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2025.04.24 15:03:54 +0530

दिनांक –२४/०४/२०२५ (श्रीमती व्ही.एस.देशमुख)
सिंधुदुर्ग – ओरोस. विशेष न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.